सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बार्टी/योजना/जेईई-नीट/२०२५/४१५२ दिनांक:-२४/०६/२०२५

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या (मातंग व इतर तत्सम मांग, मातंग मिनिमादिग, दखनी- मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारोडी, मांग गारुडी, मादगी व मादिगा या जाती वगळून) पात्र उमेदवारांसाठी मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी जेईई (JEE) आणि नीट (NEET) प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी अर्ज मागविणेबाबत.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या पात्र उमेदवारांसाठी जेईई (JEE) आणि नीट (NEET) या प्रवेश परीक्षांचे निःशुल्क अनिवासी ऑफलाईन प्रशिक्षण खाजगी व नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांमार्फत राबविण्यात येते. महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील (मातंग व इतर तत्सम मांग, मातंग मिनिमादिग, दखनी- मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारोडी, मांग गारुडी, मादगी व मादिगा या जाती वगळून) जे उमेदवार सन-२०२५ ची इयत्ता १० वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत अशा उमेदवारांसाठी सन २०२५- मे २०२७ या कालावधीसाठी जेईई (JEE) आणि नीट (NEET) या प्रवेश परीक्षांचे **मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर** या ठिकाणी ऑफलाईन प्रशिक्षण राबविण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर प्रशिक्षणासाठी इयत्ता १० वीच्या गुणांच्या आधारे व रु.८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या पात्र उमेदवारांची गुणानुक्रमे निवड केली जाईल.

**इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि. ०१/०७/२०२५ पासून ३०/०७/२०२५ पर्यंत https://cpetp.barti.in या लिंकवरुन ऑनलाईन नोंदणी करावी.**

- मातंग व इतर तत्सम (मांग, मातंग मिनिमादिग, दखनी- मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारोडी, मांग गारुडी, मादगी व मादिगा) या जातीतील विद्यार्थ्यांनी सदर योजनेबाबत अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) संस्थेच्या https://arti.org.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

स्वाक्षरी ...
(सुनिल वारे)
**महासंचालक,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**